र महानगरपालिका
लय, भाईंदर (प.)

२०९
०६/०१/२०२२




जोडपत्र अ
{ पहा नियम (३) }

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये, अर्ज.**

प्रति,
राज्य जन माहिती अधिकारी,
( कार्यालयाचे नाव व पत्ता ) : मिरा-भायंदर महिला व बाल विकास विभाग भायंदर [प]

आयुक्त
म.भा.म.न.पा.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव : श्रीमती स्नेहल विजय पवार

२. पत्ता : ५०५ राज आयकान को-ऑ.सो. भायंदर [प]

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :

( एक ) माहितीचा विषय ✻ :

( दोन ) माहितीशी संबंधित कालावधी # :

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन $ :

(चार) माहिती टपालाव्दारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) :

साईश्रध्दा ~~महिला~~ संस्थेच्या तक्रारीवर आपल्या कडून करण्यात आलेल्या कारवाईच्या प्रत मिळाव्यात वडभाई पटेलच्या संगठन महीला अनुभव त्याची माहिती, कमानटवर - चौकशी माहिती मिळावी साईश्रध्दा संस्थेने महिला बालकल्याण विभागातर्फे महिले टेंडर घेतल्या पासुन ते आता पर्यंतच्या टेंडर टेंडर अमाउंट ची माहिती मिळावी. साईश्रध्दा महिला नावावर घेतलेल्या टेंडर ची माहिती मिळावी. तसेच संस्थेचे सदस्य व पत्त्याची माहिती मिळावी.
केवळ - व्यक्तिशः

(पाच) टपालाव्दारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) लिफाफ्यात व स्पिड पोस्ट व्दारे : —

४. अर्जदार दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहे काय? (असल्यास, सोबत पुराव्याची छायांकित प्रत जोडावी) : —

ठिकाण : भायंदर [प]

दिनांक : 06-01-2022

अर्जदाराची स्वाक्षरी

( Spawar )
श्रीमती. स्नेहल वि. पवार

✻ विषयाचा स्थूल प्रवर्ग दर्शविण्यात यावा ( शासकीय जमीन देणे / सेवा बाबी / परवाने इत्यादी )
# ज्या कालावधी संबंधातील माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे.
$ माहितीचा विशेष तपशील दर्शविणे आवश्यक आहे.

# मिरा भाईदर महानगरपालिका

**महिला व बालकल्याण विभाग**

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

माहितीचा अधिकार

**जा.क्र.मनपा/मबाक/९५ /2021-22** **दि.०५ / ०२ /2022**

**प्रति**
**श्रीम. स्नेहल विलास पवार**
**404 राज आसमान को. ऑ. सो.**
**भाईंदर (प)**

**विषय:- माहिती अधिकार अधिनियम 2005**
**साईश्रध्दा संस्थेच्या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देणेबाबत**
**संदर्भ:- आपला दि.06/01/2021 रोजीचा माहिती अधिकार अर्ज**

**महोदय,**

माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत आपण महिला व बालकल्याण विभागांतर्गत खालीलप्रमाणे माहिती मागविलेली आहे.

- साईश्रध्दा संस्थेवर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती निरंक आहे.
- साईश्रध्दा संस्थेच्या टेंडरबाबत अभिलेख्यात उपलब्ध असलेल्या छायांकित कागदपत्राच्या एकुण --०३--- प्रती सोबत जोडुन देण्यात येत आहे.
- साईश्रध्दा महिला बचत गटाबाबत महिला व बालकल्याण विभागाशी माहिती निगडीत नसल्याने सदर माहिती आपणास समाज विकास विभाग यांचेकडुन उपलब्ध होईल.

**(चारुशिला खरपडे)**
**माहिती अधिकारी तथा महिला व**
**बालकल्याण अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत
समाज विकास विभाग

for
१४/०२/२०२२
समाजविकास
विभाग

EM771349195IN IVR:69777713491
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:3,14/02/2022,12:0
To:SNEHAL PAWAR,404 RAJ AASMAN C
PIN:401101, Bhayander West S.O
From:MIRA BHAYAN,MUKYA KARYALAYA
Wt:42gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>

अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त
(महिला व बालकल्याण) यांचे कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०१ १०१.
जा.क्र.माअधि/अपिल/ १० /२०२२-२३
दि. ११ /०४/२०२२

माहितीचा अधिकार

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (महिला व बालकल्याण विभाग), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

............. अपिलार्थी

श्रीम. स्नेहल विकास पवार
पुष्पराज को.ऑ.हौ.सो.
स्वामी सत्यानंद मार्ग,
भाईंदर (प.)

................प्रतिवाद

जनमाहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (महिला बालकल्याण विभाग),
मिरा भाईंदर महानगरपालिका.

-: विवेचन :-

श्रीम. स्नेहल विकास पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) नुसार जनमाहिती अधिकारी, महिला बालकल्याण विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे खालील माहिती मिळणबाबत दि. ०६/०१/२०२२ रोजी अर्ज केला.

साईश्रध्दा संस्थेच्या तक्रारीवर आपल्याकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या प्रती मिळाव्यात. वल्लभभाई पटेलच्या संगणक शिकवलेल्या अनुभव दाखला त्याची माहिती, इन्कम टॅक्सची माहिती मिळावी. साईश्रध्दा संस्थेने महिला व बालकल्याण विभागामध्ये पहिले टेंडर घेतल्यापासून ते आतापर्यंतच्या टेंडर प्रती, टेंडर अमाऊंटची माहिती मिळावी. साईश्रध्दा महिला बचतगटावर घेतलेल्या टेंडरची माहिती मिळावी. तसेच सदस्य व पत्त्याची माहिती मिळावी.

अपिल दाखल करण्याची कारणे :-

माहिती अधिकारअधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत अपिलार्थी यांनी विभागात अनेकवेळा पाठपुरावा करुनही हवी असलेली माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१६/०२/२०२२ (प्राप्त दि. २४/०३/२०२२) रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीचा तपशिल:-

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (महिला बालकल्याण विभाग), मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि. ०६/०४/२०२२ रोजी दुपारी १.१५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मनपा/उपआ.(म.वा.क)/मा.अ/१०/२०२२-२३, दि. ०१/०४/२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (महिला बालकल्याण विभा[illegible] भाईंदर महानगरपालिका सुनावणीस उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-**

आवश्यक असलेल्या माहिती करीता विभागात अनेकवेळा पाठपुरावा करुनही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

**जनमाहिती अधिकारी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-**

अपिलार्थी यांस विभागात उपलब्ध असलेली माहिती दस्तऐवज तपासून अवगत करुन देण्यात येईल.

**-: निर्णय :-**

१. अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे.
२. अपिलार्थी यांनी दाखल केलल्या माहिती अधिकारातील अर्जात आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी नमूद केलेला नसल्याने जनमाहिती अधिकारी, महिला बालकल्याण विभाग यांनी उपरोक्त माहिती संदर्भात अभिलेख तपासून त्यांना आवश्यक असलेली माहिती १५ दिवसांत देणेत यावी.
३. सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(संजय शिंदे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप-आयुक्त (महिला व बालकल्याण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१. श्रीम. स्नेहल विकास पवार
पुष्पराज को.ऑ.हौ.सो.
स्वामी सत्यानंद मार्ग,
भाईंदर (प.)

२. जनमाहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (महिला व बालकल्याण विभाग),
मिरा भाईंदर महानगरपालिका.

३. माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप-आयुक्त (महिला व बालकल्याण) यांचे कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका.